# सूचना

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा (NMMS) २०१९-२०**
**परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठीच्या सूचना**

खाली नमूद केल्याप्रमाणे राष्ट्रीय प्रज्ञाशोध परीक्षेची नोंदणी व अर्ज भरण्यासाठी पुढील टप्पे आहेत.

A. **शाळा नोंदणी करणे व शाळा संलग्नता शुल्क ऑनलाईन भरणे.**
B. School Profile भरणे.
C. विद्यार्थ्यांची नोंदणी करणे व ऑनलाईन अर्ज भरणे.
D. विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क ऑनलाईन भरणे.

**A. शाळा नोंदणी करण्यासाठी पुढील माहितीची आवश्यकता आहे**

परिषदेच्या www.mscepune.in व http://nmms.mscescholarshipexam.in या संकेतस्थळाच्या Homepage वरील डाव्या बाजूस असलेल्या उपक्रम मधील शाळा नोंदणी (School Registration) या Tab वर क्लिक करा. उघडलेल्या पेजवरील पुढील सूचना काळजीपूर्वक वाचून शेवटी असलेल्या **नवीन नोदणीला जा (Click here to Register) व अर्ज भरा या लिंकवर क्लिक करा**. त्यानंतर उघडलेल्या पेजवरील Click here to Register या Tab वर क्लिक करा. नोंदणी करण्यासाठी पुढील माहितीची आवश्यकता आहे.

१. शाळेचा युडायस (UDIES) नंबर अचूक नमूद करणे.

२. शाळेचा युडायस (UDIES) नंबर नमूद केल्यानंतर SARAL वरुन आलेली (Auto generate झालेली) शाळेची सर्व माहिती अचूक आहे याची खात्री करावी. जी माहिती आलेली नसेल/अपूर्ण असेल किंवा चुकीची असेल तर सदर माहिती Edit करुन अचूक नमूद करावी.

३. जर माहिती अपूर्ण असेल तर शाळेचा पूर्ण पत्ता अचूक नमूद करा, ठिकाण/लँडमार्क, रस्ता, पेठ, गाव, तालुका, जिल्हा व पिनकोड (६ अंकी) या क्रमाने अचूकपणे नमूद करा.

४. पिनकोड नमूद करताना तो ४ ने सुरु होईल याची खात्री करा.

५. शाळेचे माध्यम (School Medium) Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

६. School Type Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

७. शाळेचा Area (Rural/Urban) Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

८. शाळेचा Syllabus Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

९. संपर्क माहितीमध्ये मुख्याध्यापकांचा दहा अंकी मोबाईल क्रमांक अचूक नमूद करा.

१०. शाळेत निवासाची सोय असल्यास Available व नसल्यास Not Available हा पर्याय Hostel Facility Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

११. आपला शाळेचा Email ID अचूकपणे नमूद करा.

१२. पडताळणीसाठी त्याच्या खालील रकान्यात तोच Email ID पुन्हा अचूकपणे नमूद करा.

१३. वरील सर्व माहिती योग्यरीत्या भरल्यानंतर Submit या बटनावर क्लिक करा. Submit बटनावर क्लिक केल्यानंतर कोणत्याही परिस्थितीत माहितीत बदल करता येणार नाही.

१४. Submit बटनावर क्लिक केल्यानंतर शाळा संलग्नता शुल्क रु. २००/- भरण्यासाठी Proceed to pay हा पर्याय उपलब्ध होईल.

१५. Proceed to pay या बटनावर क्लिक केल्यास ऑनलाईन पध्दतीने शाळा संलग्नता शुल्क भरण्यासाठी क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड व एटीएम पीन, इंटरनेट बँकिग, valet/कॅश कार्ड असे पर्याय उपलब्ध होतील. आपणास सोयीस्कर असलेल्या पर्यायाद्वारे ऑनलाईन शुल्क भरावे.

**१६. चलनाद्वारे/ऑफलाईन शुल्क भरण्याचा पर्याय उपलब्ध नाही. याची नोंद घ्यावी.**

१७. ऑनलाईन शुल्क भरतेवेळी इंटरनेट, वीज जाणे यामुळे शुल्क जमा न झाल्यास पुन्हा लॉगीन करुन शुल्क ऑनलाईन भरावे.

१८. शुल्क जमा झाल्यास स्क्रीनवर, ईमेलवर व मोबाईलवर Payment Successful असा मेसेज येईल. आणि Transaction Details स्क्रीनवर दिसतील.

१९. Transaction Details Download करा व Print काढा.

२०. आपण नमूद केलेल्या शाळेच्या Email ID व मोबाईल वर शाळा लॉगीनचे User Name व Password प्राप्त होईल.

**२१. शाळा नोंदणी केल्याशिवाय विद्यार्थ्यांची नोंदणी करता येणार नाही.**

***

# सूचना

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

### राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा (NMMS) २०१९-२०
### परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठीच्या सूचना

## B. School Profile ची माहिती भरणे.

१. शाळेच्या Email ID व मोबाईलवर प्राप्त झालेल्या User Name व Password द्वारे लॉगीन करावे.

२. लॉगीन केल्यानंतर School Profile ची माहिती भरण्याबाबतचा फॉर्म उपलब्ध होईल.

३. सदर फॉर्म मध्ये School UDISE Code, School Name, Principal/Head Master Mobile No. व Email या क्रमाने सदरच्या शाळेची माहिती automatically येईल. जी माहिती आलेली नसेल/अपूर्ण असेल किंवा चुकीची असेल तर सदर माहिती Edit करुन अचूक नमूद करावी.

४. शाळेचा पत्ता - ठिकाण/लँडमार्क, गाव, तालुका, जिल्हा अचूकपणे नमूद करा.

५. पिनकोड नमूद करताना तो ४ ने सुरु होईल याची खात्री करा.

६. शाळेचा Syllabus Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

७. शाळेचा टेलिफोन नंबर अचूकपणे नमूद करा.

८. शाळेचे माध्यम (School Medium) Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

९. शाळेचा Area (Rural/Urban) Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

१०. School Type Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

११. Upload Principal/Head Master Photo with Signature:- मुख्याध्यापकांचा फोटो व स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यपध्दती - ८.५ से.मी. X ४.५ से.मी. चा चौकोन पांढऱ्या कागदावर काळ्या शाईच्या पेनाने स्पष्ट स्वाक्षरी इमेज २ kb ते १०० kb या आकारामध्ये बसेल याची खात्री करुन घ्यावी.

१२. वरील सर्व माहिती योग्यरित्या भरल्यानंतर Save या बटनावर क्लिक करा.

**१३. एकदा भरलेली शाळेची माहिती सर्व विद्यार्थ्यांसाठी एकच असेल.**

***

# सूचना

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा (NMMS) २०१९-२०**
**परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठीच्या सूचना**

## C. विद्यार्थ्यांची नोंदणी करणे व ऑनलाईन आवेदनपत्र भरणे.

१. School Profile ची माहिती भरुन Save या बटनावर क्लिक केल्यानंतर, School Dash board वरील उजव्या बाजूस असलेल्या Student Registration Form या बटनावर विद्यार्थ्यांचा फॉर्म भरण्यासाठी क्लिक करा.

२. Student Registration Form या बटनावर क्लिक केल्यानंतर Verify SARAL हे पेज उघडेल. शाळेचा UDISE Code Automatically येईल.

३. Enter Student ID या रकान्यात विद्यार्थ्याचा SARAL ID नमूद करुन Verify बटनावर क्लिक करावे. Verify बटनावर क्लिक केल्यानंतर विद्यार्थ्याचा फॉर्म उघडेल.

४. **विद्यार्थ्याचा SARAL ID नसल्यास Manual Registration या बटनावर क्लिक करावे. Manual Registration बटनावर क्लिक केल्यानंतर विद्यार्थ्याचा फॉर्म उघडेल.**

५. विद्यार्थ्याचा SARAL ID नमूद केल्यानंतर SARAL मधून विद्यार्थ्याचे पूर्ण नाव, Gender, जन्मतारीख, जात व दिव्यांगाचा प्रकार ही माहिती automatically येईल. जी माहिती आलेली नसेल/अपूर्ण असेल किंवा चुकीची असेल तर सदर माहिती Edit करुन अचूक नमूद करावी.

६. विद्यार्थी विनाअनुदानित शाळेत शिकत आहे का? शिकत असेल तर Yes व शिकत नसेल तर No हा पर्याय Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

७. विद्यार्थी केंद्रीय विद्यालयात शिकत आहे का? शिकत असेल तर Yes व शिकत नसेल तर No हा पर्याय Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

८. विद्यार्थी जवाहर नवोदय विद्यालयात शिकत आहे का? शिकत असेल तर Yes व शिकत नसेल तर No हा पर्याय Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

९. विद्यार्थी शासकीय वसतिगृहाच्या सवतलीचा, भोजन व्यवस्थेचा व शैक्षणिक सुविधांचा लाभ घेत आहे का? लाभ घेत असेल तर Yes व शिकत नसेल तर No हा पर्याय Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

१०. विद्यार्थी सैनिकी शाळेत शिकत आहे का? शिकत असेल तर Yes व शिकत नसेल तर No हा पर्याय Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

११. Upload Student Photo with Signature:- विद्यार्थ्याचा फोटो व स्वाक्षरी अपलोड करण्याची कार्यपध्दती - ८.५ से.मी. X ४.५ से.मी. चा चौकोन पांढऱ्या कागदावर काळ्या शाईच्या पेनाने स्पष्ट स्वाक्षरी इमेज २ kb ते १०० kb या आकारामध्ये बसेल याची खात्री करुन घ्यावी.

१२. विद्यार्थ्याचे Gender Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

१३. विद्यार्थ्याची जन्म तारीख DD, MM, YYYY या प्रमाणे अचूकपणे नमूद करावे.

१४. आधार कार्ड असल्यास आधार क्रमांक अचूकपणे नमूद करा. आधारकार्ड नसल्यास सदरचा रकाना रिकामा सोडावा.

१५. विद्यार्थ्याची इयत्ता ७ वी ची श्रेणी Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

१६. विद्यार्थ्यास इयत्ता ७ वी मध्ये मिळालेली टक्केवारी नमूद करा.

१७. Differently abled / Disabled या रकान्यात विद्यार्थी दिव्यांग असेल तर Yes व विद्यार्थी दिव्यांग नसेल तर No हा पर्याय Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

१८. Yes पर्याय निवडला असेल तर Type of Disability मध्ये दिव्यांगत्व Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

१९. विद्यार्थी दिव्यांग असेल तर दिव्यांग प्रमाणपत्रावर नमूद असलेली दिव्यांगत्वाची टक्केवारी नमूद करावी.

२०. Need a writer for exam या रकान्यात विद्यार्थ्यास writer पाहिजे असेल तर Yes व writer पाहिजे नसेल तर No हा पर्याय Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

२१. विद्यार्थ्याची जात संवर्ग Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

२२. विद्यार्थी राहत असलेला विभाग शहरी / ग्रामीण (Rural/Urban) Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

२३. भारत सरकार यांचे No.३६०३९/१/२०१९-Estt (Res) दि. ३१ जानेवारी २०१९ च्या अधिसूचनेनुसार Economically Weaker Section (EWS) च्या आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असेल तर Yes हा पर्याय आणि घ्यावयाचा नसेल तर No हा पर्याय Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा. सदर आरक्षणाचा लाभ घेण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याचे EWS प्रमाणपत्र मुख्याध्यापकांकडे जमा करणे आवश्यक आहे.

२४. विद्यार्थ्याचा राहत असलेल्या ठिकाणाचा पूर्ण पत्ता :- ठिकाण/लँडमार्क, गाव, तालुका व जिल्हा या क्रमाने अचूकपणे नमूद करावा.

२५. राहत असलेल्या ठिकाणाचा ६ अंकी पिनकोड अचूकपणे नमूद करावा.

२६. परीक्षेसाठी MAT आणि SAT या विषयासाठी माध्यम Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

२७. Bank Account Information या रकान्यात विद्यार्थ्याचे बँकेचे खाते असेल तर Yes व बँकेचे खाते नसेल तर No हा पर्याय Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

२८. Yes पर्याय निवडला असेल तर Bank Account Number, IFSC Code, Name of Bank, Branch and Full Address of the Branch अचूकपणे नमूद करा.

**Family Details:-**

२९. Father's Education:- वडिलांचे शिक्षण Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

३०. Father's Occupation:- वडिलांचा व्यवसाय Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

३१. Mother's Education:- आईचे शिक्षण Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

३२. Mother's Occupation:- आईचा व्यवसाय Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

३३. विद्यार्थ्यास किती भाऊ आहेत Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

३४. विद्यार्थ्यास किती बहिणी आहेत Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

३५. कुटूंबातील एकूण बहिण भाऊ यांमध्ये विद्यार्थ्याचा कितवा क्रमांक आहे Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

३६. कुटूंबात किती व्यक्ती आहेत Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

३७. परिवाराचे उत्पन्न Dropdown लिस्ट मधून अचूकपणे निवडा.

३८. संपर्क माहितीमध्ये पालकांचा दहा अंकी मोबाईल क्रमांक अचूकपणे नमूद करा.

३९. पालकाचा Email ID अचूकपणे नमूद करा.

**Declaration:-**

४०. सदरच्या Declaration फॉर्ममध्ये मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्याची इ. ७ वी च्या गुणांची टक्केवारी, एकूण मिळालेले गुण व एकूण गुण ही माहिती अचूकपणे नमूद करावी.

४१. वरील सर्व माहिती योग्यरित्या भरल्यानंतर Preview या बटनावर क्लिक करा.

४२. Preview या बटनावर क्लिक केल्यानंतर विद्यार्थ्याचे भरलेले आवेदनपत्र दिसेल.

४३. सदर आवेदनपत्रात विद्यार्थ्याची भरलेली सर्व माहिती बरोबर आहे. याची खात्री करावी.

४४. जर विद्यार्थ्याची कोणती माहिती चुकीची भरलेली असेल व ती दुरुस्त करावयाची असेल तर Edit बटनावर क्लिक करावे व सदर दुरुस्ती करुन Save / Preview या बटनावर क्लिक करावे.

४५. Save / Preview या बटनावर क्लिक केल्यानंतर विद्यार्थ्याचे भरलेले आवेदनपत्र दिसेल.

४६. विद्यार्थ्याची सर्व माहिती भरलेली बरोबर असल्यास Submit या बटनावर क्लिक करा.

४७. डाव्या बाजूस Dash Board या बटनावर क्लिक केल्यानंतर वर नमूद केलेल्या विद्यार्थ्याची माहिती Dash Board वर Pending Payment Student list या मध्ये दिसेल.

४८. उपरोक्त प्रमाणे या परीक्षेस प्रविष्ठ होणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांचे फॉर्म भरावे.

***

# सूचना

# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणे

**राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती परीक्षा (NMMS) २०१९-२०**
**परीक्षेसाठी ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठीच्या सूचना**

## D. विद्यार्थ्याचे परीक्षा शुल्क ऑनलाईन भरणे.

१. डाव्या बाजूस Dash Board या बटनावर क्लिक केल्यानंतर वर नमूद केलेल्या विद्यार्थ्यांची माहिती Dash Board वर Pending Payment Student list यामध्ये दिसेल.

२. Dash Board वर उजव्या बाजूस असलेल्या Make Payment या बटनावर क्लिक करावे.

३. प्रत्येक विद्यार्थ्याच्या माहिती समोर Check Box ☐ आहे. Check Box मध्ये ✓ टिक करुन विद्यार्थ्याचे वैयक्तिक / सामुहिक शुल्क भरण्यासाठी Proceed to payment या बटनावर क्लिक करावे.

४. Proceed to payment या बटनावर क्लिक केल्यास ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्याचे शुल्क भरण्यासाठी क्रेडीट कार्ड, डेबिट कार्ड व एटीएम पीन, इंटरनेट बँकिग, valet/कॅश कार्ड असे पर्याय उपलब्ध होतील.

५. आपणास सोयीस्कर असलेल्या पर्यायाद्वारे ऑनलाईन शुल्क भरावे.

**६. चलनाद्वारे / ऑफलाईन शुल्क भरण्याचा पर्याय उपलब्ध नाही.**

७. ऑनलाईन शुल्क भरतेवेळी इंटरनेट, वीज जाणे यामुळे शुल्क जमा न झाल्यास पुन्हा लॉगीन करुन शुल्क ऑनलाईन भरावे.

८. शुल्क जमा झाल्यास स्क्रीनवर, ईमेलवर व मोबाईलवर Payment Successful असा मेसेज येईल. आणि Transaction Details स्क्रीनवर दिसतील.

९. Transaction Details Download करा व Print काढा.

१०. Payment details जर पुन्हा पहावयाचे असतील तर Dash Board वर डाव्या बाजूस असलेल्या Transaction History या बटनावर क्लिक करावे.

***